Annexure IX (13), (Vide Article - 9.01 (xv))

निसर्ग पर्यटन स्थळे, पानवठे, व नदयांचा
उगम, राष्ट्रीय उद्याने इत्यादी ठिकाणी प्लॅस्टिक
वापरावर बंदी घालणेबाबत

महाराष्ट्र शासन
शासन परिपत्रक क्रमांक- सकीर्ण-२००८/प्र.क्र. १६७/फ-५
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक:- १३ /१/२००९

मुंबई येथे सन २००५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर प्लॅस्टिकच्या वापरावर बंदी घालण्याचा प्रस्ताव पुढे आला.

दैनंदिन वापरातील प्लॅस्टिकच्या वाढत्या वापरामुळे निसर्गाची होणारी हानी लक्षात घेवून, नैसर्गिकदृष्टया महत्वाची ठिकाणे व वन्यजीव प्राण्यांचा वावर असणाऱ्या ठिकाणी प्लॅस्टिकच्या वापरावर बंदी घालण्याचा प्रस्ताव विचाराधीन होता.

सदर प्रस्तावास अनुलक्षुन निसर्ग पर्यटन स्थळाच्या ठिकाणी मोठया प्रमाणावरील प्लॅस्टिकच्या वापरामुळे स्वच्छतेला येणारी बाधा व पर्यायाने "निसर्ग पर्यटन" ही संकल्पनाच धोक्यात येण्याची शक्यता तसेच वनातील पानवठे, नदयांचे उगम येथे पाणी पिण्यासाठी जाणारे वन्य प्राण्यांना या प्लॅस्टिकपासून होणारे धोके प्रसंगी त्यांच्या जीवितास होणारी हानी या गोष्टी लक्षात घेवून निसर्ग पर्यटन स्थळ, वनातील पानवठे, नदयांचे उगम, वनातील वन्यप्राण्याचा वावर असणा-या ठिकाणी लॅस्टिकच्या वापरास बंदी घालण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रकाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.
महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(शो. शि. मत्रे)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन व प्रशासन), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६) सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रा)/सर्व मुख्य वनसंरक्षक/ सर्व वनसंरक्षक
७) सर्व कार्यासन (वन विभाग), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
८) निवड नस्ती फ-५, कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्राल, मुंबई ३२.